( कोर्ट )

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** फुरसुंगी पोलीस स्टेशन

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0237 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/06/2026 02:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 02/04/2026

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/06/2026

**Time From (वेळेपासून):** 15:39 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 05/06/2026 **Time (वेळ):** 00:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/06/2026 02:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एमएसईबी कार्यालय, हडपसर,आयबीएम, ओ अँड एम,भेकराईनगर, फुरसुंगी, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.अविनाश बाबासाहेब घरबुडे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक ,विभाग, पुणे,फुरसुंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक ,विभाग, पुणे,फुरसुंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860667770

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.रामचंद्र नारायण लोंढे | | | 1. फलट नं 103, एकदंत हेरीटेज, को-ऑप हौसींग सोसायटी,,प्लट नं 22, सेक्टर 20,कष्णानगर, चिंचवड, पुणे, फुरसुंगी पोलीस स्टेशन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फुरसुंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.क्र.237/2026, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7
फियाद तारीख 05/06/2026

मी अविनाश बाबासाहेब घरबुडे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9860667770

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 02/06/2026 रोजी 12.30 वा मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कक्षात बोलावुन श्री. सागर पांडुरंग वाघवले, वय - 43, धंदा - सब कॉंट्रॅक्टर (ईलेक्ट्रीकल) रा. स नं 6/2, फलॅट नं 202, शकुंतला हाईटस, वेताळ वस्ती, मांजुरी बु. ता. हवेली, जि. पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. तसेच सदर कारवाई करीता आम्हाला ला प्र वि कार्यालयात उपलब्ध असलेले सहसंचालक आरोग्य सेवा, पुणे विभागाचे पंच उपलब्ध करुन दिले. सदर पंचाना आम्ही संपर्क केला असता केला असता पंच 1) श्री. संदिप अशोक देसुरकर, वय 43 वर्षे, पद - कनिष्ठ लिपीक, सहसंचालक आरोग्य सेवा, पुणे पंच 2) श्री. अनुप प्रताप जेधे, वय 41 वर्षे, पद - शुश्रुषा ऑर्डली, सहसंचालक आरोग्य सेवा, पुणे हे उपलब्ध झाले. ते ला प्र वि कार्यालयात बोलावुन घेतले ते 13.00 वा चे सुमारास ला प्र वि कार्यालयात आले. तसेच सदर कारवाई करीता आम्हास पोशि/95 रवि दिवेकर, म पो.अंम./7364 भुषण ठाकुर, आणि चालक पो शि 10674/ माळी असे पथक उपलब्ध करुन दिले. पंच, तक्रारदार व सापळा पथकाची आपपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी दोन्ही पंचांची माहिती घेतली. त्यानंतर मी दोन्ही पंचांना तक्रारदार यांची लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रार असल्याचे सांगितले व सदर तक्रारीची पडताळणी करावयाची असल्याचे सांगून पडताळणी पंचनाम्याचा उददेेश व कारवाई पदधत समजावून सांगितली. व त्यांना पंच म्हणून काम करण्याची विनंती केली असता त्यांनी पंच म्हणून काम करण्याची स्वखुषीने संमती दर्शविली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतले असता तक्रारदार श्री सागर वाघवले यांनी कथन केली ती खालीलप्रमाणे."मी वरील प्रमाणे असुन मी ईलेक्ट्रीक कॉंट्रक्ट घेत असतो. मी श्री ईलेक्ट्रीकल्स अँण्ड इंजीनीअर्स, पुणे या कंपनीच्या लायसन्सवर कामे घेऊन करीत असतो. मी राहत असलेल्या परिसरामधील अंजनीपुत्र हाईटस, रेल्वे गेट, मांजरी, पुणे या ईमारतीस नवीन विज कनेक्शन घेऊन देण्याचे काम मला दि. 07/04/2026 रोजी मिळाले होते. त्या कामाच्या अनुशंगाने मी श्री ईलेक्ट्रीकल्स अँण्ड इंजीनीअर्स, पुणे या कंपनीच्या लायसन्सवर विज कनेक्शन मिळणेकरीता दि. 07/04/2026 रोजी मी अतिरीक्त कार्यकारी अभियंता, एमएसईबी, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम यांना अर्ज केला होता.

माझ्या अर्जावर कारवाई होवुन श्री. रामचंद्र लोंढे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, एमएसईबी, ओ अँड एम सब-डीव्हीजन, आयबीएम यांनी माझा अर्ज सहायक अभियंता, एमएसईबी, एई पीएस लाईन्स - 1 यांना पुढील कारवाईकरीता यांचेकडे कागदपत्रासह देण्याकरीता माझ्या ताब्यात दि. 27/04/2026 रोजी दिला होता. सदरचा अर्ज घेऊन मी श्री. देशमुख, सहायक अभियंता, एमएसईबी, एई पीएस लाईन्स - 1 यांना दि. 28/04/2026 रोजी भेटलो. त्यावेळी त्यांनी मला अतिरीक्त कार्यकारी अभियंता, लोंढे साहेबांना भेटा असे सांगीतले. त्यामुळे मी दि. 30/04/2026 रोजी अतिरीक्त कार्यकारी अभियंता, लोंढे साहेब यांना त्यांचे कार्यालयात जाऊन भेटलो त्यावेळी त्यांनी मला लोड नाही असे सांगीतले. त्यानंतर मी वांरवार त्यांचे कार्यालयात माझ्या कामाच्या संदर्भात माहिती

घेण्याकरीता जात होतो.

दि. 29/05/2026 रोजी मी माझ्या कामाच्या संदर्भात अतिरीक्त कार्यकारी अभियंता, लोंढे साहेब यांना भेटण्यासाठी गेलो असता, लोंढे साहेब यांनी मला मी यापुर्वी मी मार्च-एप्रिल 2026 मध्ये 12 विज मिटर कनेक्शनच्या झालेल्या कामाचे 12,000/- रुपये पुन्हा मागीतले व मला म्हणाले की मी तुला वॉटसअप मेसेज करून देखिल तु 12 मीटरचे पैसे दिले नाहीस. त्यांनी सदर कामचे 12 हजारा देण्यासाठी मला दिनांक 13/05/2026 रोजी व्हॅटसअँपवर टो - 12 म्हणजे सांकेतीक भाषेत टोटल 12 हजार असा मेसेज केला आहे. त्याचा स्क्रीन शॉट मी सदर तक्रारी सोबत जोडत आहे. त्यावेळी मी नाईलाजास्तव 4,500/- रुपये दिले. तसेच अंजनीपुत्र हाईटस, रेल्वे गेट, मांजरी, पुणे या ईमारतीस नवीन विज कनेक्शन घेऊन देण्याचे काम कामाकरीता 50,000/- रुपये मागीतले. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयातुन निघुन आलो. श्री. रामचंद्र लोंढे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, एमएसईबी, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम हे मागत असलेल्या रकमेबाबत मी श्री ईलेक्ट्रीकल्स अँण्ड इंजीनीअर्स, पुणे यांचे मालक श्री. किरण कदम यांना माहिती दिली असुन मी अँटी करप्शन ब्युरो येथे तक्रार करणार असल्याचे सांगीतले आहे.

श्री. रामचंद्र लोंढे, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, एमएसईबी, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम यांनी मागणी केलेली 50,000/- रुपये व 12,000/- रुपये रक्कम हि कोणतीही शासकीय फि नसल्याचे मला माहिती असुन त्याबाबत माझी खात्री आहे. माझे लोंढे साहेब यांचेसोबत कोणतेही वाद तसेच आर्थीक संबंध नाहीत. लोंढे साहेब यांनी मागणी केलेली रक्कम मला त्यांना देण्याची ईच्छा नसल्याने त्यांचेविरुध्द आपले विभागामार्फत कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे." वगैरे मजकुराची तक्रार लिहून दिली. नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जासंबधीत असलेल्या लोकसेवकांकडे पडताळणी बाबत तक्रारदार श्री. वाघवले यांचेकडे विचारणा केली असता, तक्रारदार यांनी मला लोकसेवक श्री रामचंद्र लोंढे यांना दिनांक 02/06/2026 रोजी महावितरणचे अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे लाच रक्कम घेवुन भेटायला बोलावले असल्याचे सांगितले. तेथे जावुन लोकसेवक लोकसेवक श्री रामचद्र लोढे यांना भेटणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांना लोकसवक यांचे कार्यालय अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय,ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे पाठवुन लोकसेवक श्री रामचंद्र लोंढे यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्या प्रमाणे दिनांक 02/06/2026 रोजी 12.35 वा चे दरम्यान मी, तक्रारदार श्री वाघवले हे त्यांचेकडील दुचाकी वाहनाने, पंच व सापळा पथक अंमलदार पोशि/95 रवि दिवेकर, पो.अं./7364 भुषण ठाकुर आणि चालक पो शि 10674/ माळी शासकीय वाहन ईर्टिगा गाडी क्र. MH12UC4109 ने ला प्र वि कार्यालय, पुणे येथुन साधु वासवाणी चौक - फामीमानगर - हडपसर गाडीतळमार्गे - पुणे - सोलापुर महामार्गावरील कुमार मिडोज शेजारील मोची शोरुम समोरील पार्कीगमध्ये सुरक्षित ठीकाणी 15.05 वा चे सुमारास पोहचलो. पुढील कारवाई हि कोणासही संशय येऊ नये म्हणुन तेथुनच करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर मी तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. आणि माझेकडील एक नवीन सिलबंद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर सॅनडिस्क अल्ट्रा कंपनी 32 जी.बी. चे मायक्रो एस.डी. कार्ड त्याचे एका बाजुस SanDisk Ultra 32GB Micro SD HC I व दुसरे बाजुस 6032DXCG60XH BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले तक्रारदार श्री सागर वाघवले यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच तक्रारदार, पंच यांचे निवेदन घेतेवेळी पो.अं. ठाकुर हे मोबाईल मध्ये मध्ये चित्रिकरण करतील अश्या सुचना दिल्या. त्यानंतर माझे सुचनेवरुन पो शि क्र 95/दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन प्रथम तक्रारदार, व नंतर पंचाचे सापळापुर्व पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 15:18 वा. होती त्याच वेळेस पो.अं. ठाकुर यांनी निवेदनावेळेचे चित्रिकरण केले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून माझे ताब्यात ठेवला. आणि तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास पडताळणी कारवाई अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर माझे सुचनेनुसार पोशि दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. वाघवले व पंच क्र. 1 श्री. देसुरकर यांना तक्रारदार यांनी आणलेल्या दुचाकी वाहन क्रं MH12PE8979 वरुन लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे रवाना

केले. ती वेळ 15:39 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक शासकीय वाहनामध्ये बसुन सदर ठिकाणी थांबून राहीलो.
त्यानंतर साधारणपणे 16:40 वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. वाघवले व पंच क्र. 1 श्री. देसुरकर हे पथक थांबलेल्या ठिकाणी तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने आले तेव्हा पोशि दिवेकर यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून, तो बंद केला. त्यानंतर पंच क्र 1 श्री देसुरकर यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, "मी व तक्रारदार असे आम्ही लोकसेवक यांची भेट घेणे करीता अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे गेलो तेथे कार्यालयाच्या पार्कींगमध्ये तक्रारदार यांनी त्यांचे वाहन पार्क करुन आम्ही दोघे कार्यालयात गेलो. तेव्हा लोकसेवक श्री रामचंद्र लोंढे हे तेथे हजर होते. त्यावेळी आम्ही दोघे त्यांचेजवळ गेलो. त्यावेळी लोकसेवक लोंढे हे तक्रारदार यांना "काय सागर भाऊ, कुठे गायब झाले भाऊ" असे म्हणाले.
त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक लोंढे यांना "काय तुम्हीच कुठ गायब ए, ते रेल्वे गेट, ते अंजनीपुत्र नाय का" असे म्हणाले असता असे बोलले. त्यावेळी लोकसेवक लोंढे तक्रारदार यांना "आपण त्या दिवशी सव्हेला गेलतो, तेंव्हा हे नव्हते का?" असे माझ्याकडे ईशारा करत म्हणाले. त्यावेळी तक्रारदार वाघवले हे लोकसेवक लोंढे यांना " हे नाय, हे हयांचे सातवचे हे आहे सुपरवायझर" असे म्हणाले. त्यानंतर तक्रारदार अवघले व लोकसेवक लोंढे यांचेमध्ये बराचवेळ कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी तक्रारदार वाघवले लोकसेवक लोंढे यांना "मेसेज टाकला होता काय, कोटेशन पण काढत नाय" असे बोलले त्यावेळी लोकसेवक लोंढे हे तक्रारदार यांना "अं.." बोलले. त्यावेळी तक्रारदार हे लोकसेवक लोंढे यांना "मेसेज टाकलाय तुम्ही मला" असे म्हणाले त्यावर लोकसेवक लोंढे हे तक्रारदार यांना "करुन टाकायचे" असे म्हणाले त्यावर तक्रारदार हे लोकसेवक लोंढे यांना "बारा... तुम्ही सांगा की, त्यातले साडेचार,साडेचार तर दिलेत" असे म्हणाले. त्यानंतर लोकसेवक लोंढे यांना फोन आलेने ते फोनवर बोलत होते. फोनवर बोलुन झाल्यानंतर तक्रारदार अवघले लोकसेवक लोंढे यांना "क्लिअर करा की ते व्हॉटसअँपच" असे म्हणाले त्यावर लोकसेवक लोंढे यांनी तक्रारदार यांना "काय" अशी विचारणा केली. त्यावर तक्रारदार वाघवले हे लोकसेवक लोंढे यांना "तुम्ही टाकलय ते व्हॉटसअँपला" असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा त्यांचेमध्ये बराच वेळ चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक लोंढे यांनी मला बाहेर थांबण्यास सांगीतल्याने मी तेथेच सदर ठिकाणी बाजुला ऐकु येईल असा थांबुन राहीलो. तक्रारदार व लोकसेवक यांचेमधील संभाषण संपल्यानंतर मी व तक्रारदार वाघवले असे सदर ठिकाणाहुन निघुन तक्रारदार यांचे दुचाकी वाहनावरुन पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. असे सांगुन नमुद पडताळणी कारवाई दरम्यान मी तक्रारदार वाघवले यांचेसह लोकसेवक लोंढे यांची भेट घेऊन माझे समक्ष मी पाहिले व ऐकले नुसार लोकसेवक लोंढे यांनी तक्रारदार वाघवले यांचेकडे साडेसात हजार रुपयांची लाच मागणी केली आहे असे सांगीतले.
त्यानंतर मी पंचासमक्ष तक्रारदार वाघवले यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता त्यांनीहि पंच क्रं 01 यांनी सांगीतलेप्रमाणेच हकिकत सांगुन चर्चेदरम्यान लोंढे साहेब यांनी पंच देसुरकर यांना बाहेर थांबवील्यानंतर मी लोकसेवक लोंढे यांना चर्चे दरम्यान म्हणालो की "12 मीटरचे पाचशे प्रमाणे की हजार प्रमाणे " तेव्हा लोकसेवक लोंढे यांनी "हजार प्रमाणे काय होतील ते देवुन टाकायचे आपल, पहील चारच केले ना " असे म्हणाले त्यावर मी म्हणाले "हा चाडेचार केलेत" त्यावर लोकसेवक लोंढे म्हणाले "दया की काय असेल ते तुमच्या हयानी ". तेंव्हा मी लोकसेवक लोंढे यांना "किती?" अशी विचारणा केली असता, लोकसेवक लोंढे हे मला "जे सांगीतले ते" असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक लोंढे यांना "साडेसात" असे म्हणाले व "कॅश, कॅश" असे म्हणाले त्यावर लोकसेवक लोंढे यांनी होकारअर्थी मान डोलावली. नंतर मी सदर ठिकाणाहुन निघुन पंच क्रं 1 देसुरकर यांना सोबत घेऊन पथक थांबले त्या ठिकाणी माझ्या दुचाकी वाहनावरुन परत आलो. "लोंढे साहेब यांनी लाच मागणी केली त्यावेळी पंच 1 देसुरकर हे माझ्या जवळच होते व त्यांनी ते पाहिले व ऐकले असल्याचे सांगीतले."अशी हकिकत आम्हा पंचासमक्ष सांगीतली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. सदर पडताळणी करावाईवरुन लोकसेवक रामचंद्र लोंढे, यांनी तक्रारदार सागर वाघवले यांना त्यांनी केलेल्या 12 विज मिटर कनेक्शनच्या झालेल्या कामाचे 12,000/- रुपये मागणी करुन त्यातले 4500/- रुपये घेतल्याचे मान्य करुन उर्वरीत 7500/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दि. 03/06/2026 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले होते परंतु तक्रारदार यांनी वैयक्तीक कारण सांगुन सापळा कारवाई दि. 04/06/2026 रोजी करण्याबाबत विनंती केल्याने पुढील कारवाई दि. 04/06/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक 04/06/2026 रोजी पंच व संपुर्ण सापळा पथक 11:10 वा. सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथुन निघुन तक्रारदार यांना 11.50 वा पुणे - सोलापुर महामार्गावरील कुमार मिडोज शेजारील मोची शोरुम समोरील पार्कीगमध्ये सुरक्षित ठीकाणी भेटलो. तक्रारदार यांना शासकीय वाहनामध्ये बसवुन विचारणा केली असता तक्रारदार यांनी लाच मागणीची तक्रार कायम असल्याचे सांगून अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे जावुन लोकसेवक श्री. रामचंद्र लोंढे यांनी मागणी केलेप्रमाणे लाचरक्कम त्यांना देणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली असता त्यांनी 500 रुपये दराच्या 15 नोटा काढुन त्या त्यांच्या स्वकमाईचे असुन सदर रक्कम सापळा कारवाई करीता वापरण्याचे ठरवले त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार श्री. लोंढे व पंच क्रमांक -1 श्री. संदिप देसुरकर व पंच क्रमांक - 2 श्री अनुप जेधे यांचे निवेदन 11:57 वा घेण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. सदर निवेदनाचे चित्रिकरण करण्यात आले. तक्रारदार श्री. वाघवले यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 7,500/- रु. रक्कम पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 15 भारतीय चलनी नोटा असे एकुण 7,500/- रु. असलेचे दिसुन आले. तक्रारदार श्री. वाघवले यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500/- नोटा एका को-या कागदावर लिहुन घेतले त्यावर मी व पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर पो शि माळी यांनी शासकीय वाहनात पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च) व अँथ्रासिन पावडर दाखवून कारवाईतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले. तक्रारदार यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांना अँथ्रासीन पावडर लावली. अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार श्री सागर वाघवले यांचे पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये खिशात ठेवल्या.

त्यानंतर लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना ताब्यात घेतेवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉर्डीग करणेत येणार असल्याची माहिती पथकास देवून पो शि दिवेकर यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर तक्रारदार व पंचाना व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन लोकसेवक श्री रामचंद्र लोंढे यांनी लाच स्विकारल्या नंतर तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर आवारात येवुन लाच स्वीकारलेबाबतचा त्यांनी त्यांचे डाव्या हाताने डोळ्यावरील चश्मा काढुन लाच रक्कम स्विकारल्याबाबत ईशारा करणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. सापळा पथकातील टीम मधिल सर्वाना काम समजावुन सुचना देण्यात आल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशिन सुरू करून ते ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे शर्टचे आतुन लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री संदिप देसुरकर यांना लोकसेवक रामचंद्र लोंढे यांना भेटण्यासाठी अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे जाण्याकरीता तक्रारदार व पंच श्री देसुरकर असे तक्रारदार यांचे कडील मोटार सायकल वरुन रवाना केले. त्याचे मागुन मी व सापळा पथक, पंच क्रमांक दोन यांचे सह सरकारी वाहनाने सापळा कारवाई करीता शासकीय वाहना मागोमाग अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे कार्यालयाच्या दिशेने 12.32 वा रवाना झालो. अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे कार्यालयाच्या परिसरामध्ये पोहोचुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबलो असता तक्रारदार यांनी सदर कार्यालयाच्या पार्कीगमध्ये त्यांचे दुचाकी वाहन पार्क करुन तक्रारदार व पंच क्रं 1 हे लोकसेवक श्री लोंढे यांचे कार्यालयात गेले. काही वेळात तक्रारदार हे कार्यालया बाहेर आले व त्यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा त्यांनी त्यांचे डाव्या हाताने त्यांचे डोळ्यावरील चश्मा काढुन लाच रक्कम स्विकारल्याबाबत ईशारा केला. त्याचवेळी पो.अंम. दिवेकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 13.06 वा ची होती. दिलेल्या सुचना नुसार पो शि दिवेकर यांनी व्ही डी ओ रेकॉर्डीग सुरु केले. पंच श्री संदिप देसुरकर यांनी लोकसेवक हे कार्यालयातील बाथरुम कडे गेल्याचे सांगितल्याने सापळा पथक पंचासह कार्यालयातील बाथरुम केडे गेले त्यावेळी पो.अंम. ठाकुर हे लोकसेवक लोंढे यांना ताब्यात घेत असताना लोकसेवक लोंढे यांना संशय आल्याने त्यांचे शर्टच्या खिशातील लाच रक्कम काढुन बाथरुमच्या उघडया असलेल्या दरवाजामधुन आतमध्ये फेकुन दिली. तेव्हा पो शि ठाकुर यांनी लोकसेवक रामचंद्र लोंढे यांना ताब्यात घेतले त्यावेळी आरोपी लोकसेवक रामचंद्र लोंढे हे खुप घाबरलले दिसले व मला बाथरुमला जावु दया, मला बाथरुमला जावु दया असे आरडा ओरडा करु लागले. त्यावेळी मी पंचासमक्ष सदरची लाच रक्कम बाथरुममध्ये जावुन ताब्यात घेतली. आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन त्यांचा नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. रामचंद्र नारायण लोंढे, वय – 42 वर्षे, पद - अतिरीक्त कार्यकारी अभियंता, नेमणुक - हडपसर,आयबीएम, ओ अँड एम कार्यालय, एमएसईबी, पुणे, राठी – प्लॅट

नं 103, ए विंग,एकदंत हेरीटेज, सेक्टर नं 20, कृष्णा नगर, चिंचवड पुणे 19 असे सांगितले. त्यांनतर पंचा समक्ष आलोसे श्री. लोंढे यांनी बाथरुममध्ये फेकुन दिलेली लाच रक्कम मी पंचासमक्ष नोटांचे नंबर व सापळापुर्व पंचनाम्या दरम्यान कागदावरील लिहलेले नोटांचे नंबर यांची तपासणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर नमुद कार्यालयातील बाथरुमसमोरील पोर्चमध्ये कृत्रिम अंधार करुन आलोसे श्री. लोंढे यांचे दोन्ही हात तपासले असता त्यांचे उजव्या हातांचे तळहातावर तसेच बोटांचे पे-यांवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. तसेच आलोसे लोंढे यांनी सदरची लाच रक्कम स्विकारुन ती शर्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशात ठेवली असल्याने शर्टच्या खिशास आतील बाजुस व तोंडावर अँथ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. वरिल सर्व घटनेचे पो शि दिवेकर यांनी मोबाईल मध्ये व्हीडीओ चित्रिकरण केले आहे. तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने महावितरणचे सदर कार्यालयातील महिला कर्मचारी बुंदीले यांचेकडुन कागदपत्रे ताब्यात घेतली. सदरवेळी आरोपीस सापळा करवाईचा उददेश समजावुन सांगुन सापळा पथकासह पुढील कार्यावाही करता फुरसुगी पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले.

आम्ही पंच क्र 1 यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार लोकसेवक श्री रामचंद्र लोंढे यांचे कार्यालयात गेलो असता तेथे लोकसेवक श्री रामचंद्र लोंढे हे हजर होते.

त्यावेळी लोकसेवक लोंढे यांनी तक्रारदार व माझे सोबत अंजनीपुत्र हाईटस, मांजरी रेल्वे गेट येथील विज कनेक्शन संदर्भाने चर्चा केली. त्यानंतर तक्रारदार हे लोकसेवक लोंढे यांना "ते हायंच 12 मीटर चे आणलं होतं" असे म्हणाले त्यावर लोकसेवक म्हणाले "दया की " व लगेच पंचाना पाहुन म्हणाले की "बर राहु दे " असे म्हणाले व पुन्हा तक्रारदार यांचेशी चर्चा करु लागले. तेंव्हा लोकसेवक लोंढे यांनी मला बाहेर थांबण्यास सांगीतले. त्यावेळी मी त्यांचे केबीनच्या बाहेर थांबलो त्यावेळी त्यांचे केबीनचा दरवाजा उघडा असल्याने मला लोकसेवक लोंढे व तक्रारदार वाघवले हे स्पष्टपणे दिसत होते व त्यांचेमधील संभाषण ऐकु येत होते. तेंव्हा पुन्हा त्यांचेमध्ये कामासंदर्भात चर्चा सुरु होती त्यावेळी तक्रारदार वाघवले हे लोकसेवक लोंढे यांना "साहेब ते 12 मीटरचे 12 हजार रुपये" असे म्हणाले. त्यावर लोकसेवक लोंढे तक्रारदार यांना "दया की" असे म्हणाले. त्यावर तक्रारदार वाघवले यांनी लोकसेवक लोंढे यांना "धरा" असे म्हणत तक्रारदार यांनी त्यांचे पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम काढुन लोकसेवक लोंढे यांचेसमक्ष धरली. त्यावेळी लोकसेवक लोंढे यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे शर्टच्या पुढील बाजुच्या डाव्या खिशामध्ये ठेवली व खुर्चीवरुन उठुन बाहेर येऊन कार्यालयातील बाथरुमच्या दिशेने गेले. त्यावेळी तक्रारदार यांनी कार्यालयाच्या बाहेर जावुन लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा केला. त्यानंतर तक्रारदार यांना वाघवले यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत हकिकत विचारली असता, त्यांनीही पंच क्रं 01 यांचेप्रमाणेच हकिकत सांगुन लोकसेवक लोंढे यांनी लाच रक्कम स्विकारली त्यावेळी पंच 1 देसुरकर हे लोंढे यांचे केबीनच्या दरवाजाजवळच उभे होते त्यांनी ते पाहीले व ऐकले आहे अशी हकीकत सांगीतली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे.

लोकसेवक श्री. रामचंद्र नारायण लोंढे, वय – 42 वर्षे, पद - अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे राठी – प्लॅट नं 103, ए विंग,एकदंत हेरीटेज, सेक्टर नं 20, कृष्णा नगर, चिंचवड पुणे 19 यांनी तक्रारदार यांनी केलेल्या नवीन 12 वीज मीटरच्या कनेक्शनच्या याकामाचे पंचासमक्ष 12,000/रू लाच रकमेची मागणी करून त्यातील 4,500 रुपये यापुर्वी स्वीकारल्याचे कबूल केले व 7500/- रुपये लाचेची मागणी केली व दिनांक 04/06/2026 रोजी अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे येथे 7,500/रूपये लाच रक्कम स्वीकारली म्हणुन लोकसेवक श्री. रामचंद्र नारायण लोंढे, वय – 42 वर्षे, पद - अतिरीक्त कार्यकारी अभियंतायांचे कार्यालय, ओ अँड एम सबडीव्हीजन, आयबीएम,भेकराई नगर, फुरसुंगी, पुणे यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांनी केलेल्या 12 नवीन वीज मीटर कनेक्शनच्या कामाचा मोबदला म्हणुन 7,500/रू लाच रक्कम स्वीकारली आहे म्हणून माझी त्याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलीखीत करण्यात आलेला असुन तो मी वाचुन पाहीला असुन बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला.........

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

AMOL NIVRUTI MORE(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): AMOL NIVRUTI MORI
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अमलदार
फुरसुंगी पो. स्टे. पुणे शहर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)